# मेंदू गहाण ठेवलाय!

संपादकीय
जयश्री खाडिलकर-पांडेकृत

काँग्रेस अध्यक्षपदी राहुल गांधी यांचा राज्याभिषेक झाला. ही घटना अगदी उत्साहात साजरी झाली. ट्विटर, फेसबुक, इन्स्टाग्रामवर एकाही सर्वसामान्य माणसाने 'पप्पू पास हो गया' अशी ओळ टाकली नाही. किंबहुना गुजरात निवडणूक प्रचाराच्या आधीपर्यंत अगदी कुणीही अत्यंत सहजपणे राहुल गांधींना 'पप्पू' म्हणून चिडवत होता. पण अचानक सोशल मीडियावरील पप्पूचे जोक बंद झाले आणि मग पप्पू हे नावही वेगाने गायब झाले. बहुतेक जण म्हणू लागले की, राहुल गांधी सुधारले आहेत. हा निष्कर्ष त्यांनी कशावरून काढला? त्यांना सांगता येत नाही. राहुल गांधींचे अलीकडील एखादे भाषण त्यांनी ऐकले आणि त्यामुळे राहुल गांधी सुधारले असे त्यांना वाटते आहे का? या प्रश्नावर त्यांचे उत्तर होते की, मी राहुल गांधींचे भाषण ऐकले नाही, पण तो आता बरा वाटतोय. राहुल गांधी सुधारले आहेत, असे अचानकपणे अनेकांना वाटण्याचे एकच कारण म्हणजे पप्पूचे जोक सोशल मीडियावर येईनासे झाले. पप्पूचा प्रभाव संपल्याने 'राहुल गांधी' यांचा उदय झाला.

आपल्या रोजच्या आयुष्यात हेच घडते आहे. अण्णा हजारे काल म्हणाले की, भाजपाच्या खात्यात गेल्या पाच महिन्यांत ८० हजार कोटी रुपये आले. भाजपाचा निवडणुकीत विजय यामुळेच होतो आहे. भाजपाच्या विरोधात वाक्य ऐकले आणि अण्णा जे म्हणाले ते शिवसेनेचे कार्यकर्ते व्हॉट्सअपवर फिरवू लागले. पण याच अण्णांना दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी 'माकड' म्हटले होते. मग ते अण्णा खरे की हे अण्णा बरे? जेएनयू विद्यापीठात दिल्लीत शिकणारा कन्हैय्या कुमार याने देशद्रोही घोषणा दिल्याचा व्हिडीओ एका वाहिनीने व्हायरल केला. आपण हा व्हिडीओ बघितला आणि कन्हैय्याला देशद्रोही ठरवून टाकले. हा व्हिडीओ व्हायरल होईपर्यंत आपल्याला त्याचे नावही माहीत नव्हते. त्याचे विचार काय आहेत. त्याचे आदर्श कोण आहेत. त्या घटनेआधी त्याने जी भाषणे केली असतील त्यात तो काय म्हणत होता हे आपल्याला आधी माहीत नव्हते आणि व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतरही माहीत नव्हते. तो देशद्रोही घोषणा देतानाचा व्हिडीओ आपण पाहिला आणि कन्हैय्याला देशद्रोही ठरविले. काही महिन्यांत तो व्हिडीओ बनावट असल्याचे जाहीर होताच तोच देशद्रोही ठरवलेला कन्हैय्या आपला हिरोही झाला.

गौरी लंकेश नावाच्या पत्रकाराची हत्या झाली. कोण गौरी लंकेश? आपल्याला माहीत नाही. तिचे एक पानही लिखाण आपण वाचलेले नाही. तिची हत्या व्हावी असे कठोर सत्य ती मांडत होती का याची आपल्याला जाण नाही. पण पत्रकाराची हत्या झाली हे व्हायरल झालं आणि व्यक्तिस्वातंत्र्यावर आपण व्हॉट्सअप, फेसबुकवर भरभरून बोलू लागलो. शरद पवार यांनी नागपूर अधिवेशनात १२ डिसेंबरला मोर्चाचे नेतृत्व केले तेव्हा किती वर्षांनी त्यांच्या नेतृत्वाखाली अधिवेशनावर मोर्चा धडकला याचे फोटो, व्हिडीओ झळकले आणि याचीच चर्चा झाली. पण या वयातही शरद पवारांना मोर्चाचे नेतृत्व का करावे लागते? हा सवाल विचारलाच गेला नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदींचा मेघालय आणि मिझोरामचा आजचा दौरा गाजतो आहे. पंतप्रधान मेघालयसाठी मोठे पॅकेज देणार हे कौतुकाने सोशल मीडियावर फिरते आहे. पण पंतप्रधानांना अचानक उत्तर पूर्व राज्यांचा पुळका का आला असेल हा प्रश्नही कुणाच्या मनात डोकावत नाही. त्यांच्या दौऱ्याच्या ट्विट जितक्या वेगाने फिरतात तितक्याच वेगाने मेघालय आणि मिझोरामच्या २०१८ साली विधानसभा निवडणुका आहेत हे कुणी फिरवत नाहीत. कर्नाटकात कन्नड भाषेला प्राधान्य देण्यासाठी हिंसक आंदोलने झाली की, धडाधड त्याचे व्हिडीओ व्हायरल होतात. पण कर्नाटकात २०१८ साली विधानसभा निवडणुका आहेत म्हणून हे चालले आहे याचा विचार नाही. किंबहुना कर्नाटकात जेव्हा जेव्हा 'निवडणूक' असते तेव्हाच कन्नड भाषेसाठी आंदोलने होतात का याचा अभ्यास करायची कुणाची इच्छाच नाही.

एका वाहिनीने यावेळी दिवाळी अंक प्रकाशित केला आणि तो धडाधड खपू लागला. हा दिवाळी अंक इतका खपण्याचे कारण काय? त्यातील लिखाणाचा दर्जा अतिउच्च होता की अचानक राज्यातील वाचनसंस्कृती बहरली होती? दुकानदाराने सत्य सांगितले. तो म्हणाला, अहो दिवाळी अंक खपत नाहीत. पण या दिवाळी अंकाची त्या वाहिनीवर पाच-पाच मिनिटाला जाहिरात दाखवतात. त्यामुळे लहान मुलेच आईबाबांना तो अंक घ्या म्हणून मागे लागतात. आजकाल जाहिरातीवरूनच आपण शाम्पूपासून कोणत्या कंपनीचे मध घ्यायचे ते ठरवितो. आयुर्वेदिक औषधे बनवायला आपल्या ऋषीमुनींना प्रदीर्घ काळ लागायचा. पण त्यांच्याच पद्धतीनुसार औषधं बनविण्याचा दावा करीत एक भगवा वस्त्रधारी बाबा पूर्ण मार्केटात औषधांचा ढीग लावतो, तेव्हा इतक्या प्रमाणात आयुर्वेदिक औषधांची निर्मिती कशी शक्य आहे हे आपण विचारतही नाही. एका टूथपावडरपासून आपण सुरुवात केली. आता म्हणतात त्यात मीठ आहे. मग सांगतात कोळसा आहे. एक म्हणतो त्यांच्या मधात साखर नाही, इतरांच्या मधात साखर आहे, गुरांना मका घालणारे आपण आता जाहिराती पाहून नाष्ट्याला मक्याचे कॉर्नफ्लेक्स खाऊ लागलो आहोत.

जे दिसतं तेच अंतिम सत्य असा काळ आला आहे. जे दिसतं ते तसंच मान्य करायचं, त्याचा अभ्यास करायचा नाही, त्यावर विचार करायचा नाही. जे दिसतं त्यावरच निर्णय घेऊन टाकायचा, त्याबाबतचं खरंखोटं पडताळून बघायचं नाही, असा जमाना झालाय. नजरेत आहे तोवर स्मरणात आहे, नजरेसमोरून गेलं की स्मृतीतून गेलं अशी स्थिती आहे. आपल्या आयुष्यावर अशा दृष्य गोष्टींनी पूर्ण कब्जा घेतला आहे. आता तर गुगलने यावर्षी सर्वाधिक विचारल्या गेलेल्या प्रश्नांची यादी जाहीर केली आहे. आधार लिंक कसे करायचे हा प्रश्न सर्वाधिक गुगल केला गेला. आपण कोणते प्रश्न विचारले याची यादी गुगल देते तर आपण कोणते प्रश्न विचारले पाहिजेत, हे ठरवून सोशल मीडियावर त्यानुसार भडिमार केला जाऊ शकतो. आपण कोणत्या विषयाला प्राधान्य द्यायचे, कोणता विषय आपल्या डोक्यात आला पाहिजे याचे नियंत्रणच या भडीमारातून होणार आहे.

हे सर्व ज्या मार्गाने चालले आहे ते धोकादायक आहे. क्रिया आणि प्रतिक्रिया ही अभ्यासाविना होणे चिंताजनक आहेत. आपण मेंदू दुसऱ्याकडे गहाण ठेवून जगतो आहे ही प्रगती नव्हे तर अधोगती आहे. दोन अधिक दोन किती असे विचारले तर आपण मोबाईलमधील कॅलक्युलेटर उघडतो, आपला स्वतःचा मोबाईल नंबर आपल्याला आठवत नाही. सगळं स्टोअर करायचे नाहीतर गुगलवर बघायचे यामुळे मेंदूचा उपयोगच होत नाही. माकडाचा माणूस कसा झाला याचा सिद्धांत मांडताना डार्विनने सांगितले की, शरीराचा जो भाग निरुपयोगी होता तो गळून गेला किंवा आकाराने लहान होत गेला आणि उत्क्रांती होत माकडाचा माणूस झाला. हा सिद्धांत खरा असेल तर हळूहळू आपण गहाण टाकलेला मेंदू निरुपयोगी ठरत त्याचा आकार लहान होत जाईल आणि सोशल मीडिया व दृश्य गोष्टींवर केवळ प्रतिक्रिया देणाऱ्या माणसाचं माकड होईल. अणुऊर्जा उपयुक्त आहे म्हणून विज्ञान वापरून अणुस्फोट केला. पण त्याचा उपयोग विध्वंसक अशा अणुबॉम्ब निर्मितीसाठी झाला. तंत्रज्ञानाचा उपयोग ज्ञान वाढवून पुढची झेप घेण्यासाठी करायचा होता. परंतु आपण मात्र तंत्रज्ञानाची गुलाम माकडं बनले आहोत.